e-news letter

# e जलसेवा Bulletin

Enabling efficient water management
कार्यक्षम जलव्यवस्थापनासाठी

Volume : III Issue : 3 July 2013

Government of Maharashtra
Water Resources Department

• Editor •
T. N. Munde

• Executive Editor •
Sharad Dabhadkar

• Editorial Board •
Mrs. Purnima Desai Mr.Prashant Kadam
Mrs. Dhanashree Limaye Mr.Avinash Patil

**Our Vision** *Transform WRD into modern & service driven department through Information & Communication Technology*

## संपादकीय



ई-जलसेवा प्रकल्पाची ११ मोड्यूल्स १ जुलै पासून उपलब्ध होत असून आता एकूण ३० मोड्यूल्स पीएमओ टीमच्या अथक परिश्रमामुळे कार्यान्वित झाली आहेत, हे नमूद करताना मला अतिशय आनंद होत आहे. ई-जलसेवा प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी दोन्ही प्रधान सचिव, कार्यकारी संचालक व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पाठबळ लाभत आहे. यामुळे पीएमओ टीमचा उत्साह वाढला आहे. नुकतेच अधीक्षक अभियंत्यासाठी कोयना संकल्प चित्र मंडळात ई-जलसेवा विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. त्यात अधीक्षक अभियंतानी सक्रीय सहभाग घेऊन प्रणालीत माहिती भरण्याविषयीच्या अडचणींवरही उहापोह केला. सर्व अधीक्षक अभियंता यांनी हा प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याचे ठरविले. ही एक जमेची बाजू आहे. बांधकाम कार्यप्रकारातील मास्टर ट्रेनर्सद्वारे मंडळा अंतर्गत प्रशिक्षण बऱ्याच ठिकाणी पूर्ण झाले असून प्रणालीत माहिती भरण्याचे काम जोमाने सुरू आहे. शासन निर्णय दि.६/६/२०१३ नुसार प्रकल्पाची माहिती भरण्याचे काम १५ जुलैपर्यंत पूर्ण करावयाचे असल्याने आपण सर्वांनीच याचा वेग वाढविणे गरजेचे आहे. माहिती भरताना येत असलेल्या अडचणींची कल्पना आम्हास आहे. तरीही त्या अडचणींवर मात करून आपणा सर्वांना हे आव्हानात्मक काम यशस्वी करून दाखवायचे आहे. जून महिन्यात परिवर्तन व्यवस्थापन टीमद्वारे अत्यंत कमी कालावधीत विविध प्रशिक्षण सत्रे, कार्यशाळा यशस्वीपणे आयोजित केल्या आहेत. या प्रणालीच्या अंमलबजावणीत कार्यकारी अभियंता यांची महत्त्वाची भूमिका लक्षात घेऊन एकूण २०० कार्यकारी अभियंत्यांच्या ४ कार्यशाळा मेटा, नाशिक येथे घेण्यात आल्या. या कार्यशाळेत त्यांना प्रणालीची प्राथमिक माहिती व ती वापरण्याची कार्यपद्धती याबद्दल माहिती देण्यात आली. या कार्यशाळेस आपण दिलेल्या सत्वर प्रतिसादाबद्दल हार्दिक धन्यवाद ! आपणास पुरविण्यात आलेल्या लॅपटॉपमधील उबंटू ऑपरेटींग सिस्टिमच्या अपग्रेडेशनचे काम मे एचसीएल तर्फे कोयना संकल्प चित्रमंडळात चालू आहे. यामुळे कोणत्याही कंपनीचे डेटा कार्ड (डोंगल) वापरणे शक्य झाले आहे. एचसीएल तर्फे लॅन वायरिंगचे काम क्षेत्रीय कार्यालयात चालू असून बीएसएनएल तर्फे लवकरच नेटवर्क कनेक्टीव्हिटी पुरविण्यात येणार आहे. लवकरच सिंचन व्यवस्थापन कार्यप्रकारातील मोड्यूल्स कार्यान्वित करण्यासाठी पीएमओ प्रयत्नशील आहे. माहिती प्रणालीत सुधारणा करण्याचे काम यापुढे हाती घेण्यात येईल व ते समांतरपणे चालू राहिल. सिंचन व्यवस्थापन कार्यप्रकारातील मोड्यूल्सच्या मास्टर ट्रेनर्स चे प्रशिक्षण त्यानंतर सुरू होणार आहे. ई- जलसेवा प्रकल्पामुळे आपल्या विभागाची एक नवी ओळख निर्माण होणार आहे. व यात आपल्या सर्वांचाही मोलाचा वाटा असणार आहे.

प्रत्यक्ष डेटा भरण्यासाठी वापरावयाच्या संकेत स्थळाचा पत्ता
https://wrd.maharashtra.gov.in
सराव किंवा प्रशिक्षणासाठी वापरावयाच्या संकेत स्थळाचा पत्ता
http://wrdtest.maharashtra.gov.in/portal
सर्व मंडळांना ई-जलसेवा भित्तीपत्रके (पोस्टर्स) पुरविण्यात येत आहेत. ही पोस्टर्स कार्यालयाच्या दर्शनी भागात कृपया लावण्यात यावीत.

## Training Strategy : Innovative Approach by CM Team

Capacity building & training is most important for successful implementation of e-Jalseva project. The training is necessary to enable users to acquire new skills and capabilities.

After lot of deliberations and discussions in PMO, It has been decided that each circle office will nominate officers for Master trainer's training. It will become the responsibility of circle level Project Management Team to send appropriate officers and train their staff through there Master trainer. The circle office will provide all kind of support for conducting training under their circle. The strategy for the Master Trainer (MT) training is as follows:

1. There will be a total of 4 MT's selected from each circle for each functional area.
2. Functional Areas :
   Construction Modules + Support Modules + Specific Modules + Management Modules
3. Training Venues:
   MT training will only be conducted at the WRD Institutes, i.e. META, Nashik, Walmi, Which are fully equipped for conducting training.

**Organising Training :**

The following strategy is adopted for ensuring full participation in each batch.

1. Nominations for 1.5 times the batch size are called by e-mail from each circle office.
2. Dedicated mobile phone connection and good handset is provided for effective and continuos communication.
3. Mobile numbers and e-mail ids of candidates are collected.
4. The candidates are contacted in person by CM team and their pro-activeness and ability as Master trainers is broadly judged as per pre-decided criteria.
5. Invitation letter to attend the training is sent to selected candidates by e-mail and informed by sms.
6. Contact groups are created in mobile. Group sms is sent to all trainees to obtain confirmation.
7. During training various group messages are sent such as welcome message, class timings, Dos & Don'ts, farewell messages, followed by their role and responsibilities etc.
8. Course content, agenda and training material is mailed to all.
9. Assessment tests are conducted during training session.
10. Master trainers availed 8 am to 8 pm and holidays for hands on and practice.
11. Master trainers were given rewards in various forms to ensure high motivational level.
12. Concluding ceremony is arranged in presence of top authority and participating officers are encouraged to express their feedback during this program.

This strategy has resulted in best communication with the participants even after the training. Also this process has ensured 100% and pro-active participation by trainees.

## Sharing my experience of EPGP-EG at IIM Indore and views about eJalseva

**Pravin Kolhe**, Executive Engineer



After joining for Executive e-Governance Programme (EPGP-EG) at Indian Institute of Management, Indore (IIM Indore) I was wondering about 'why EPGP-EG is started at IIM, instead of IIT? When we talk about e-Governance, first thing comes to our mind is 'e'. 'e' refers to 'electronic'. So our focus shift to ICT rather that good governance. Since 4th April 2013, we are learning (and unlearning) diverse issues and subjects. After completing two semesters & 20 courses in period of four months, we realized that course structure is inclined towards 'governance' rather than 'ICT' and it has to. e-Governance is a holistic approach supported by four pillars- i.e. People, Process, Technology and Resources. Out of these, 'people' is the most crucial pillar. Organizational Development & change management plays crucial role in enabling people to adopt new culture. One of the reason behind failure is lack of participation of 'people'. Therefore, we came to conclusion that, technology is not everything in e-Governance, rather, it is just an enabler. e-Governance project is created for the people and by the people. If process is heart of project, people is mind. The first 3 words 'ego' is main hurdle for the success of project. Therefore, the capacity building programme for e-Governance project should have focus on people and hence, it is logical that EPGP-EG is offered by IIM. The face value of Water Resources department is decreased and department started losing confidence & trust of common man in recent past. The root cause analysis of the problem will reveal that the cause for the current situation lies in the outdated processes. Fortunately, it is not too late as 'eJalseva' which is ambitious e-Governance project is being implemented from Maharashtra Day-2013. This project along with some proactive measures will help in restoring the status of our department by satisfying citizen's demands through best services. e-Jalseva is very large scale e-Governance project, which started its journey towards successful implementation. The roll out of project is the most crucial stage, in the project life cycle, unless project is accepted by the people, it cannot succeed. eJalseva is best example of effective change management. As the innovative concepts like establishment of dedicated PMO, CPMT, RPMT, TOT approach are undertaken successfully. At IIM Indore, we discussed the role of strategies and change management aspects of the eJalseva projects. The efforts exerted by the PMO team & e-Champions are highly appreciated. Indeed this is a great start towards 'SMART-Simple, Moral, Accountable, Responsive & Transparent' Government, but this is not a destination. Mahatma Gandhi quoted as- 'The best way to find yourself is to lose yourself in the service of others'. e-Jalseva will assist us in achieving vision of our department.

I congratulate all those involved in this project and wish it a grand success in future.

## ई-जलसेवा वृत्तांत

1. Pilot phase III of 12 modules completed at PMO, KDC with the help of field coordinators
2. Go live phase II of 12 modules is scheduled on 1st July 2013.
3. e Jalseva two days workshop for Executive Engineers (100 nos.) has been successfully completed at META, Nashik during 18/6/13 to 21/6/13.
4. Current news related to flood and other events are uploaded on WRD portal.
5. Daily Reservoir status is uploaded on WRD portal
6. Govt. division accounts sent to AG , Nagpur through M24 of the system.
7. MTs are working hard and total 130000 hits have been recorded on WRD portal test site
8. One day workshop of SE has been conducted at KDC, Pune on 7/6/13

## ई-जलसेवा : जलसंपदा खात्यातील एक क्रांती

**व.व्यं.हंद्राळे**, कार्यकारी अभियंता, म.प्र.वि. नांदेड



जलसंपदा विभागाची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात असून या विभागाचा केंद्र बिंदू हा शेतकरी आहे. देशाचे उत्पादन वाढविणे व शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी जलसंपदा विभागाचा फार मोठा सहभाग आहे. या विभागाची पारंपारिक पध्दतीची कार्यपध्दती बदलून इंटरनेटचा वापर करुन पेपररहित कार्यपध्दती अवलंबिणे ही काळाची गरज असून सध्याच्या जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकून राहणेसाठी हे फार आवश्यक आहे. हे साध्य करण्यासाठी जलसंपदा खात्याने ई-जलसेवा/ई-प्रशासन प्रणाली अवलंबिण्याचे जे धोरण स्विकारले आहे. ही एक स्वागतार्ह व आनंदाची बाब असून हा एक महत्वाचा मैलाचा टप्पा आहे. या प्रणालीचा अवलंब केल्यास खात्याची कार्यपध्दती खुप गतीमान होईल. क्षणात अचुक माहिती मिळू शकेल, शेतकऱ्यांना व समाजातील इतर संबंधीत घटकांना विनासायास माहिती मिळू शकेल. ही एक खरोखरच खात्याची महत्वाची उपलब्धी आहे. या प्रणालीचे सॉफ्टवेअर तयार करणेची (पोर्टल व वेगवेगळे मोड्युल्स इ.) जबाबदारी शासनाने कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचेकडे दिली असून गेले ३ वर्षे अहोरात्र मेहनत घेऊन त्यांनी अतिशय उपयुक्त व सर्व समावेशक अशी माहिती व्यवस्थापन प्रणाली विकसीत केली आहे. मेटा,नाशिक येथे नुकतेच या ई-जलसेवा कार्यशाळेत प्रशिक्षण घेण्याची मला संधी मिळाली. जलसंपदा खात्यातील सर्व वरिष्ठ अधिकारी व संबंधीत कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात येत असून त्याचे नियोजन अतिशय चांगल्या पध्दतीने करण्यात आले आहे. हे काम अतिशय अवघड व जिकरीचे आहे. तथापि कोयना संकल्पचित्र मंडळ अतिशय समर्थपणे हे शिवधनुष्य पेलण्याचे काम श्री.टी.एन.मुंडे,अ.अ., श्री. दाभाडकर, का.अ., श्रीमती पोर्णिमा देसाई , का.अ. व त्यांची टीम करत आहे. त्यांना श्री. कदम, श्री. पाटील व इतर सहकारी मोलाची साथ देत आहेत. ई-जलसेवा प्रकल्प यशस्वीपणे अंमलबजावणीसाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा !



अधीक्षक अभियंता यांची एकदिवसीय ई-जलसेवा कार्यशाळा, पुणे. (७/६/२०१३)



कार्यकारी अभियंता यांची दोन दिवसीय ई-जलसेवा कार्यशाळा, मेटा, नाशिक (२१ व २२ जून २०१३)

### अभिनंदन

'ई-जलसेवा' विषयावरील कार्यकारी अभियंता यांच्या एकदिवसीय कार्यशाळेस प्रणाली वापरण्याच्या कार्यपध्दतीविषयी मार्गदर्शन केल्याबद्दल खालील अधिकाऱ्यांचे

**हार्दिक अभिनंदन !**

१) योगेश दाभाडे (का.अ.) २) रजनी ठाकूर (स.का.अ.) ३) संगीता खैरनार (स.का.अ.) ४) विशाल खैरनार ५) संदीप पाटील ६) तुषार चिनावलकर ७) दशरथ पवार ८) मनोहर आरणे ९) अरुण कापडणीस १०) योगिता बागूल ११) मधु नवलखा

### Be an ICIS e-news author......



We at ICIS e-news letter offer an opportunity to our readers to contribute articles and be a part of a family of ICIS e-news author. In particular, we will appreciate receiving contributions on articles bearing on innovative approach in e-governance, development and use of software in day to day department activities.